जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025
पुढारी

# ज्ञाननिर्मिती केली तरच इनोव्हेशन घडेल : देसाई

## सृष्टी संजीवन राष्ट्रीय पर्यावरण परिषदेची सांगता

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

ज्ञान निर्मिती केली तरच इनोव्हेशन घडेल, त्यामधून टेक्नॉलॉजी निर्माण होईल. यातून सामान्य माणसांना अनेक सुविधा देता येतील, असे प्रतिपादन आयएसटीईचे चेअरमन प्रतापसिंह देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय सृष्टी संजीवन राष्ट्रीय पर्यावरण परिषदेची सांगता झाली. याप्रसंगी ते बोलत होते. परिषदेत राष्ट्रीय स्तरावरून १३० हून अधिक शोधनिबंधांचे सादरीकरण झाले. संशोधकांनी पोस्टर प्रेसेंटेशन केले.

डॉ. देसाई म्हणाले, भारतामध्ये दरवर्षी १७ लाख अभियंते तयार होतात. तथापि प्रत्यक्ष जीवनातील समस्या सोडवण्याची क्षमता बाळगणारे अभियंते तुलनेने कमी असतात. जगप्रसिद्ध अनेक कंपन्यांमध्ये ३० टक्के भारतीय अभियंते आहेत. या कंपन्यांचे सी.ई.ओ. भारतीय आहेत. याचा अर्थ आपल्यामध्ये ती क्षमता आहे.

डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी शिक्षक हेच अपेक्षित बदल विद्यार्थ्यांमार्फत करू शकतात, असे मत व्यक्त केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा. सागर डेळेकर यांनी शिवाजी विद्यापीठ राबवत असलेल्या नावीन्यपूर्ण संकल्पनांचा आढावा त्यांनी घेतला. तंत्रज्ञान अधिविभागाचे प्र. संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. उत्तम बोंबले यांनी करून दिली. निमंत्रक डॉ. पुनश्री फडणीस यांनी आभार मानले. इशरे कोल्हापूर चाप्टरचे अध्यक्ष प्रमोद पुंगावकर व त्यांचे सहकारी, सहनिमंत्रक एस. बी. काळे, सागर पोर्लेकर, महेश साळुंखे, श्रीकांत भोसले यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025

लोकमत

# ज्ञाननिर्मिती केली तरच इनोव्हेशन होईल : प्रतापसिंह देसाई

## सृष्टी संजीवन राष्ट्रीय पर्यावरण परिषदेची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतामध्ये दरवर्षी १७ लाख अभियंते तयार होतात. प्रत्यक्ष जीवनातील समस्या सोडवण्याची क्षमता बाळगणारे अभियंते तुलनेने कमी असतात. जगप्रसिद्ध अनेक कंपन्यांमध्ये ३० टक्के भारतीय अभियंते आहेत. या कंपन्यांचे सी.ई.ओ. भारतीय आहेत. याचा अर्थ आपल्यामध्ये ती क्षमता आहे. ज्ञाननिर्मिती केली तरच इनोव्हेशन होईल, असा विश्वास आय.एस.टी.ई.चे चेअरमन प्रतापसिंह देसाई यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग, पर्यावरण शास्त्र अधिविभाग, सेंटर ऑफ क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबिलिटी स्टडीज् यांच्यावतीने आयोजित दोन दिवसीय 'सृष्टी संजीवन' राष्ट्रीय पर्यावरण परिषदेची शुक्रवारी सांगता झाली. यावेळी देसाई बोलत होते. या परिषदेत राष्ट्रीय स्तरावरून एकूण १३० हून अधिक शोधनिबंधांचे सादरीकरण झाले. संशोधकांनी पोस्टर प्रेझेंटेशनही केले. डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी शिक्षक हेच अपेक्षित बदल विद्यार्थ्यांमार्फत करू शकतात, असे प्रतिपादन केले. प्रा. सागर डेळेकर यांनी विद्यापीठ राबवत असलेल्या नाविन्यपूर्ण संकल्पनांचा आढावा घेतला. तंत्रज्ञान अधिविभागाचे प्र. संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर यांनी प्रास्ताविक, डॉ. उत्तम बोंबले यांनी परिचय करून दिला. डॉ. पुनश्री फडणीस यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR २०१८

सकाळ

# सृष्टी संजीवन राष्ट्रीय पर्यावरण परिषदेची सांगता

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान व पर्यावरण अधिविभाग, सेंटर ऑफ क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबिलिटी स्टडीज, 'इशरे' कोल्हापूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोनदिवसीय सृष्टी संजीवन राष्ट्रीय पर्यावरण परिषदेची सांगता झाली.

कोल्हापूर व सांगली जिल्हा तसेच अन्य परिसरामध्ये पर्यावरणाचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. जल प्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, धूलिकण, पूर, पावसाचे घटते प्रमाण अशा अनेक पर्यावरणीय समस्यांना सामोरे जाण्यासाठीचे उपाय व निसर्गाशी सुसंगत राहण्यासाठी अक्षय ऊर्जा संसाधनांचा वापर याबद्दल परिषदेत सर्वंकष चर्चा झाली.

या परिषदेत राष्ट्रीय स्तरावरून एकूण १३० हून अधिक शोधनिबंधांचे सादरीकरण झाले. संशोधकांनी पोस्टरचे सादरीकरणही केले.

'आयएसटीई'चे चेअरमन प्रतापसिंह देसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भारतीय तसेच जागतिक शिक्षण प्रणालीचा आढावा घेताना ते म्हणाले, 'भारतामध्ये दरवर्षी १७ लाख अभियंते तयार होतात. जगातील अनेक कंपन्यांमध्ये ३० टक्के भारतीय अभियंते आहेत.'


0 9 MAR 2025 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# किफायतशीर कार्बनशोषक तंत्रज्ञान विकासाची गरज

## मेजर जनरल डॉ. श्री पाल; 'सृष्टी संजीवन' राष्ट्रीय पर्यावरण परिषदेस विद्यापीठात प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरणातील कार्बनचे उत्सर्जन रोखणे ही आजची महत्त्वाची गरज आहेच; पण त्याचबरोबर वातावरणातील कार्बन थेट शोषून घेणारे किफायतशीर तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेने संशोधनाची दिशा केंद्रित करणेही आवश्यक आहे, असे प्रतिपादन विशिष्ट सेवा पदक पुरस्कृत मेजर जनरल डॉ. श्री पाल यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभाग आणि इंडियन सोसायटी ऑफ हौसिंग रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स संस्थेचा कोल्हापूर चाप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सृष्टी संजीवन' या राष्ट्रीय पर्यावरण परिषदेस प्रारंभ झाला. उद्‌घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बीजभाषण करताना डॉ. पाल बोलत होते.



मेजर जनरल डॉ. श्री पाल म्हणाले, व्यक्तिगत पातळीवर श्वासोच्छ्वासातूनही आपण हे उत्सर्जन करत असतो; पण पूर्वी वनस्पतींच्या मुबलक अस्तित्वामुळे ते संतुलित राखले गेले. त्यानंतरच्या काळात गतीने वाढलेल्या औद्योगिकीकरणामुळे आणि त्यासाठी वनसंपदेच्या मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या कत्तलीमुळे हे कार्बनचे प्रमाण प्रचंड गतीने वाढले. हे प्रदूषण मानवासह जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी रोखावे लागेल. त्याच बरोबरीने कार्बन डायऑक्साईड हवेतून थेट शोषून घेणारे तंत्रज्ञानही विकसित करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, समाजाला घातक पर्यावरणीय दुष्परिणामांपासून वाचवण्यासाठी घेतलेला पुढाकार महत्त्वाचा आहे. त्यांच्या उपक्रमांशी शैक्षणिक व संशोधकीय माध्यमातून विद्यापीठ जोडले जाण्याचा आनंद वाटतो. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. ए. बी. कोळेकर यांनी स्वागत केले. समन्वयक डॉ. पुनश्री फडणीस यांनी प्रास्ताविक केले. इशरेचे प्रेसिडेंट प्रमोद पुंगावकर यांनी आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. पी. ए. प्रभू यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सहसमन्वयक सतीश काळे यांनी आभार मानले. परिषदेस डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. सचिन पन्हाळकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 MAR 2025
- लोकमत

# बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त उद्या परिसंवाद

**कोल्हापूर :** लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि. १०) विद्यापीठाच्या बाळासाहेब देसाई अध्यासनामार्फत 'महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व (१९६० ते १९८०)' या विषयावरील परिसंवाद आयोजित केला आहे. यात प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. डॉ. अरुण भोसले, ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे मांडणी करणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे हे प्रमुख उपस्थित राहतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025

तरुण भारत

# संगीतशास्त्रच्या विद्यार्थ्यांनी गिरवले तबला वादनाचे धडे

- शिवाजी विद्यापीठात कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी
कोल्हापूर

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे तबला वादन विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. कोल्हापुरातील ज्येष्ठ तबला वादक डॉ. नंदकुमार जोशी यांनी पारंपरिक घराणेदार रचना व बंदिशी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ नंदकुमार जोशी यांचा स्वागत व सत्कार अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केला.

कार्यशाळेच्या प्रथम सत्रात डॉ. जोशी यांनी तबला वादनातील पेशकार, तिस्त्र व चतस्त्र जातीचे कायदे व रेले विद्यार्थ्यांना शिकवले. दुसऱ्या सत्रात अनागत अतित, एकमुखी गत, चक्रधार गत आदी रचनांची विद्यार्थ्यांकडून पढंत करून घेऊन त्या रचनेचा निकास शिकवला. या




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यशाळेत तबला वादन करताना डॉ. नंदकुमार जोशी.

कार्यशाळेला अधिविभागातील तसेच बाहेरील संस्थांमधील विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. डॉ. जोशी यांनी रियाज पद्धती साथसंगत व स्वतंत्र तबला वादन या विषयी माहिती दिली. प्रास्ताविक प्रदीप कुलकर्णी यांनी केले. यावेळी प्रशांत देसाई, सचिन कचोटे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025
सकाळ

# संगीत-नाट्यशास्त्र अधिविभागात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे ज्येष्ठ तबलावादक डॉ. नंदकुमार जोशी यांची तबला कार्यशाळा झाली. 'पारंपरिक घराणेदार रचना व बंदिशी' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. डॉ. जोशी यांनी तबलावादनातील पेशकार, तिस्त्र व चतस्त्र जातीचे कायदे व रेले विद्यार्थ्यांना शिकवले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात अनागत अतित, एकमुखी गत, चक्रधार गत आदी रचनांची विद्यार्थ्यांकडून पढंत करून घेऊन त्या रचनेचा निकास विद्यार्थ्यांना शिकवला. रियाज पद्धती, साथसंगत व स्वतंत्र तबला वादन या विषयीही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रदीप कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रशांत देसाई, सचिन कचोटे यांनी संयोजन केले. अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी डॉ. जोशी यांचे स्वागत केले.



कोल्हापूर : तबलावादन करताना डॉ. नंदकुमार जोशी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
09 MAR 2025

पुढारी

# तबला कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे कोल्हापुरातील ज्येष्ठ तबला वादक डॉ. नंदकुमार जोशी यांची पारंपरिक घराणेदार रचना व बंदिशी या विषयावर एक दिवसीय तबला कार्यशाळा झाली. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. डॉ. नंदकुमार जोशी यांचे स्वागत व सत्कार अधिविभाग प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. प्रदीप कुलकर्णी यांनी प्रस्ताविक केले. कार्यशाळेचे आयोजन प्रशांत देसाई, सचिन कचोटे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025
लोकमत

# नाट्यशास्त्र अधिविभागात तबला कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग यांच्यावतीने ज्येष्ठ तबला वादक डॉ. नंदकुमार जोशी यांची पारंपरिक घराणेदार रचना व बंदिशी याविषयावर एकदिवसीय तबला कार्यशाळा उत्साहात झाली. प्रथम सत्रात डॉ. जोशी यांनी तबला वादनातील पेशकार, तिस्त्र व चतस्त्र जातीचे कायदे व रेले विद्यार्थ्यांना शिकवले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात अनागत अतित, एकमुखी गत, चक्रधार गत इ. रचनांची विद्यार्थ्यांकडून पढंत करून घेऊन त्या रचनेचा निकास विद्यार्थ्यांना शिकवला.

कार्यशाळेच्या शेवटी डॉ. जोशी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. विनोद ठाकूरदेसाई, प्रदीप कुलकर्णी, प्रशांत देसाई, सचिन कचोटे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025
पुण्यनगरी

# 'संगीत, नाट्यशास्त्र 'मध्ये तबला कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागामध्ये एकदिवसीय कार्यशाळा झाली. ज्येष्ठ तबलावादक डॉ. नंदकुमार जोशी यांनी मार्गदर्शन केले. स्वागत अधिविभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. प्रथम सत्रात डॉ. जोशी यांनी तबलावादनातील पेशकार, तिस्त्र व चतस्त्र जातीचे कायदे व रेले विद्यार्थ्यांना शिकवले. दुसऱ्या सत्रात अनागत अतित, एकमुखी गत, चक्रधार गत इ. रचनांची विद्यार्थ्यांकडून पढंत करून घेऊन त्या रचनेचा निकास विद्यार्थ्यांना शिकवला. शेवटी डॉ. जोशी यांनी रियाज पद्धती साथसंगत व स्वतंत्र तबलावादन याविषयी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक अधिविभागातील प्रदीप कुलकर्णी यांनी केले. कार्यशाळेचे आयोजन प्रशांत देसाई, सचिन कचोटे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025

तरुण भारत




कोडोली : येथे यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या पदवीदान समारंभात बोलताना कुल-सचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत डॉ. जयंत पाटील, विनीता पाटील, मिलींद गोडबोले, डॉ. लक्ष्मण पाटील.

# डॉक्टरांनी 'आयुर्वेदा'ने स्वस्थ जीवन पद्धती रूजवली पाहिजे

- शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही एन शिंदे
- कोडोलीत यशवंत आयुर्वेद महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ

प्रतिनिधी
वारणानगर

डॉक्टरांनी घेतलेल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग नैसर्गिक आयुर्वेद उपचारासाठी करून स्वस्थ आरोग्य जीवन पद्धती रुजवली पाहिजे असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी केले.

कोडोली ता. पन्हाळा येथील यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालयात आयोजित पदवीदान समारंभात कुलसचिव डॉ. शिंदे बोलत होते. ते पुढे म्हणाले, अन्न वस्त्र निवारा यापेक्षा अन्न, हवा, पाणी मूलभूत गरजा आहेत. ॲलोपॅथी उपचार पद्धती फार गंभीर रुग्णास गरज आहे तेथे वापरा अन्यथा आयुर्वेद हे प्रतिबंधात्मक जैव प्रक्रिया आहे त्याची उपचार पद्धती वापरा. भावी डॉक्टरांनी निसर्गाचा होत चाललेला ऱ्हास, दुर्मिळ वनौषधी वनस्पतीचे संवर्धन साठी प्राधान्य दिले पाहिजे.

रुग्णांची सर्व माहिती संकलित ठेवणे सध्या गरजेचे आहे कारण रुग्णाच्या संकलित माहिती वरून भविष्यात उपचार पद्धती सोपी होण्यास निश्चितच मदत होईल असे आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे शैक्षणिक परिषदेचे सदस्य पंकज विश्वकर्मा यांनी सांगितले.

यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पदवीदान समारंभात शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ व्ही.एन. शिंदे, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे शैक्षणिक परिषदेचे सदस्य पंकज विश्वकर्मा यांच्या हस्ते १९५ विद्यार्थांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी विश्वस्त विनिता पाटील, उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत पाटील डॉ सचिन वाघमारे डॉ आद्रा थोरात, डॉ राजश्री आवळे, डॉ.अभिजीत इंगवले उपस्थित होते. प्राचार्य डॉ. मिलिंद गोडबोले यांनी स्वागत करून शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला सूत्रसंचालन मानसी बेलापूरे, सिद्धी बनकर, अनुषा खटावकर यांनी केले. आभार डॉ राजश्री महापूरे यांनी मानले.

09 MAR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# नोकरी, व्यवसाय सांभाळत करा एमकॉम, एमएस्सी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ नॅक ए मानांकन व विद्यापीठ अनुदान आयोगाने कॅटेगिरी-। दर्जा बहाल केल्याने एमकॉम, एमएस्सी (गणित) या अभ्यासक्रमांना ऑनलाइन पद्धतीने प्रवेश देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के.बी. पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठात ऑनलाइन अभ्यासक्रमांना मान्यता : राज्यातील पहिलेच विद्यापीठ

एम.बी.ए. अभ्यासक्रम यापूर्वीच ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यास नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दूरस्थ शिक्षण परिषद, तसेच एआयसीटीई या संस्थांकडून ऑनलाइन एमबीए, अभ्यासक्रमाला मान्यता मिळाली होती. त्यानुसार हा अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने सुरू असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. अशातच एमकॉम, एमएस्सी (गणित) या अभ्यासक्रमांना ऑनलाइन



पद्धतीने प्रवेश देण्यासाठी मान्यता मिळाली असल्याने विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. त्यात शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव ऑनलाइन एमबीए, एमकॉम, एमएस्सी (गणित) सुरू करणारे सार्वजनिक विद्यापीठ ठरले. विद्यार्थ्यांना नोकरी, व्यवसाय सांभाळत ऑनलाइन एमबीए, एमकॉम, एमएस्सी (गणित), अभ्यासक्रमाची पदवी घेता येणार आहे.

हा अभ्यासक्रम प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकालापर्यंत असणारी सर्व शैक्षणिक प्रक्रिया ऑनलाइन स्वरूपाची असणार आहे. ऑनलाइन अभ्यासक्रमाच्या पदवी इतर कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या समकक्ष आहे.

## रोजगाराची संधी

एमबीए, एमकॉम व एमएस्सी (गणित) या ऑनलाइन अभ्यासक्रमासाठी सुसज्ज अशा लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमद्वारे विषयतज्ज्ञांनी विकसित केलेले व्हीडिओ लेक्चर्स, ई-बुक्स लाउड्‌ काउंसलिंग सेशन, डिस्कशन फोरम, प्रॅक्टिस टेस्टच्या माध्यमातून अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे, तसेच विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025

पुढारी



कोल्हापूर : राष्ट्रीय युवा महोत्सवातील शिवाजी विद्यापीठाच्या विजेत्या विद्यार्थ्यांसमवेत संघ व्यवस्थापक, शिक्षक आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# राष्ट्रीय युवा महोत्सवात विद्यापीठाला दोन सुवर्णपदके

**कोल्हापूर :** उत्तर प्रदेशातील नोएडा येथील ॲमिटी विद्यापीठात झालेल्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाने दोन सुवर्णपदके मिळवली. महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाचा २० जणांचा संघ सहभागी झाला होता. शास्त्रीय गायन व एकांकिका कला प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला. अर्णव बुवा याने शास्त्रीय गायनात तर शंतनू पाटील दिग्दर्शित 'बादलों की छाव में' एकांकिकेने सुवर्णपदक मिळवले. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. प्रमोद पाटील, विश्वासराव नाईक कॉमर्स, आर्टस् व बाबा नाईक सायन्स महाविद्यालय शिराळा यांनी काम पाहिले. संघास सहायक अधीक्षक सुरेखा आडके आणि विद्यार्थी विकास विभागाचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025
पुण्यनगरी



उत्तर प्रदेशातील नोएडा येथे राष्ट्रीय युवा महोत्सव २०२४-२५ मध्ये सहभागी झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

# राष्ट्रीय युवा महोत्सवात विद्यापीठाला दोन सुवर्ण

**कोल्हापूर :** राष्ट्रीय युवा महोत्सव २०२४-२५ मध्ये शिवाजी विद्यापीठाने दोन सुवर्णपदके मिळवली. उत्तर प्रदेशातील नोएडा येथील ॲमिटी विद्यापीठात झालेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाचा एकूण २० जणांचा संघ सहभागी झाला.

या महोत्सवामध्ये शास्त्रीय गायन आणि एकांकिका या दोन्ही कला प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवर आपली कला सिद्ध केली. अर्णव बुवा याने शास्त्रीय गायनात, तर शंतनू पाटील दिग्दर्शित 'बादलों की छाव में' या एकांकिकेने सुवर्णपदक मिळवले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. प्रमोद पाटील यांनी काम पाहिले. संघास सहायक अधीक्षक सुरेखा आडके आणि विद्यार्थी विकास विभागाचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाला राष्ट्रीय युवा महोत्सवात दोन सुवर्ण

कोल्हापूर : उत्तर प्रदेशातील नोएडा येथील ॲमिटी विद्यापीठात झालेल्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाने दोन सुवर्णपदक प्राप्त केली आहेत. राष्ट्रीय युवा महोत्सव २०२४-२०२५ ॲमिटी विद्यापीठ, नोएडा (उत्तर प्रदेश) येथे दि. ३ ते ७ मार्च या कालावधीत झाला. सदर महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाचा एकूण २० जणांचा संघ सहभागी झाला. सदर युवा महोत्सवामध्ये शास्त्रीय गायन आणि एकांकिका या दोन्ही कला प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवर आपली कला सिद्ध केली. अर्णव मच्छिंद्र बुवा याने शास्त्रीय गायनात तर शंतनू पाटील दिग्दर्शित 'बादलों की छाव में' या एकांकिकेने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक मिळवले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 MAR 2025
पुण्यनगरी

# न्यू कॉलेजमध्ये 'संख्याशास्त्र' कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग संचालित न्यू कॉलेजमध्ये जिल्ह्यातील बी. एस्सी. भाग एक संख्याशास्त्रच्या विद्यार्थ्यांसाठी 'संख्याशास्त्राचे व्यावहारिक उपयोग एक्सप्लोर करणे' या विषयावरील कार्यशाळा उत्साहात झाली. न्यू कॉलेजमधील संख्याशास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघ (सुस्ता) यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा झाली. प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील होते. प्राचार्य प्रा. व्ही. एम. पाटील यांनी स्वागत केले. सुस्ताचे अध्यक्ष प्रा. डॉ. एस. बी. महाडिक यांनी कार्यशाळेच्या आयोजनाचा उद्देश सांगितला. डॉ. ए. ए. कलगोंडा यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. आभार समन्वयक डॉ. डी. जी. गोडसे यांनी मानले. यावेळी व्हा. चेअरमन डी. जी. किल्लेदार, संचालक वाय. एल. खांडे, प्राचार्य पी. के. पाटील, उपप्राचार्य आर. डी. ढमकाले, प्रबंधक एम. वाय. कांबळे उपस्थित होते. कार्यशाळेत २०० हून अधिक विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

09 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वर्तमानातील लेखन भविष्यातील दस्तावेज

## प्रा. डॉ. अवनीश पाटील : भारतीय इतिहास संकलन समितीतर्फे चर्चासत्र

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : 'आजच्या वर्तमान काळातील लेखन आणि संकलन हे भविष्यकाळात इतिहास संशोधनाचा दस्तावेज होऊ शकतो,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. अवनीश पाटील यांनी केले.

खरी कॉर्नर येथील श्री लक्ष्मी मंगल कार्यालय येथे भारतीय इतिहास संकलन समितीतर्फे आज चर्चासत्राचे आयोजन केले होते. जिल्ह्याच्या निर्मितीला ७५ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त 'कोल्हापूर जिल्ह्याची अमृत महोत्सवी वाटचाल १९४९ ते २०२५' असा चर्चासत्राचा विषय होता.




कोल्हापूर : उमाकांत राणिंगा, ॲड. प्रसन्न मालेकर यांनी लिहिलेल्या 'करवीर निवासिनी महालक्ष्मी' पुस्तिकेचे प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर.

डॉ. पाटील यांनी इतिहास संकलन समितीच्या कार्याचे कौतुक करत जिल्ह्याच्या निर्मितीचा अमृतमहोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा व्हायला हवा होता, असे मत व्यक्त केले. सचिव डॉ. आरेन हर्डीकर यांनी जिल्ह्याच्या भौगोलिक आणि सामाजिक वाटचालीचा आढावा घेतला. अध्यक्ष डॉ. बी. डी. खणे यांनी चर्चासत्राची भूमिका सांगितली. यावेळी उमाकांत राणिंगा, ॲड. प्रसन्न मालेकर यांनी लिहिलेल्या 'करवीर निवासिनी महालक्ष्मी' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. हर्डीकर, प्रा. अ. रा. जयतीर्थ यांच्या सौजन्याने ही पुस्तिका इतिहास संकलन समितीने प्रकाशित केली. प्राचार्य डॉ. व्ही. एस. पवार यांनी चर्चासत्राच्या प्रारंभी कोल्हापूर जिल्ह्याच्या निर्मितीच्या संदर्भातील तपशील संदर्भासह सांगितले.

डॉ. वंदना पुसाळकर यांनी 'जयंती नाला, नव्हे नदीच' यावर विचार मांडले. डॉ. राजश्री निकम यांनी 'दलितमित्र बापूसाहेब पाटील' यांचा परिचय करून देणाऱ्या शोधनिबंधाचे वाचन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. केशव हरेल, हर्षदा कदम, डॉ. श्वेतलिना पाटील, योगशिक्षिका मनीषा शिंदे, प्रियांका पाटील यांनी शोधनिबंध सादर केले. डॉ. नीला जोशी यांनी 'करवीर महाराणी जिजाबाई यांची राजकीय भूमिका' या शोधनिबंधाचे वाचन केले. किशोर दीक्षित, ॲड. मालेकर यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025

तरुण भारत

# शिक्षणशास्त्र अधिविभागात महिला दिन उत्साहात

**कोल्हापूर :** शिवजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभागात महिला दिनानिमित्त महिला आणि मुलींसाठी हक्क समानता, सबलीकरण या विषयावर व्याख्यानचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. विद्यानंद खंडागळे, मानसोपचारतज्ज्ञ आम्रपाली रोहिदास यांनी महिलांनी शारीरिकदृष्ट्या सक्षम असण्याबरोबरच मानसिकदृष्ट्या देखील सक्षम असणे काळाची गरज असल्याचे सांगितले. महाराष्ट्र शासनाचा बालस्नेही पुरस्कार प्राप्त मीना कलकुंद्रे-भाले यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे होत्या. अधिविभागामधील विद्यार्थ्यांनी अविष्कार, भितीपत्रके व चित्रफितीद्वारे महिलांचे विविध क्षेत्रातील योगदान व त्या संदर्भात त्यांची माहिती सादर केली.

यावेळी डॉ सुप्रिया पाटील, सरस्वती कांबळे, आनंदा कुंभार, अर्चना कुराडे, अंजली गायकवाड, विनया कांबळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन भाग्योदय कांगोणे व सुषमा संकपाळ यांनी केले. आभार योगेश कुमार यांनी व्यक्त केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025

सकाळ

# एम.कॉम., एम.एस्सी. ऑनलाईन अभ्यासक्रमांना मान्यता

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला नॅकचे ए प्लस प्लस मानांकन व विद्यापीठ अनुदान आयोगाने कॅटेगिरी एकचा दर्जा दिल्याने आता एम.कॉम.,एम.एस्सी (गणित) या अभ्यासक्रमांना ऑनलाईन पद्धतीने प्रवेशासाठी मान्यता मिळाली असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली. नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दूरस्थ शिक्षण परिषद तसेच 'एआयसीटीई' या संस्थांकडून ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रमाला यापूर्वीच मान्यता मिळाली आहे. त्यानुसार हा अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने सुरू असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्याशिवाय आता शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव ऑनलाईन एमबीए, एमकॉम, एमएस्सी (गणित) सुरू करणारे सार्वजनिक विद्यापीठ ठरले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नोकरी, व्यवसाय सांभाळत हे अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने करता येणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025
पुढारी

# ऑनलाईन एम.बी.ए.च्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शुल्कात सवलत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने सुरू असलेल्या ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ अधिकार मंडळाने शुल्कामध्ये सवलत दिली आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित होणाऱ्या विद्यापीठातील आजी-माजी कर्मचारी, त्यांचे पाल्य तसेच पदवीधर विद्यार्थी, महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, शिक्षक वर्ग तसेच विद्यापीठ व प्रशासकीय कर्मचारी व त्यांचे पाल्य यांना यातील एक किंवा एकापेक्षा अधिक गटात समावेश असणाऱ्या विद्यार्थ्यास शुल्कामध्ये एकत्रित १० टक्के सवलत देण्यात येणार आहे. तसेच सरकारी संस्था, निमसरकारी व खासगी संस्था यांच्याकडून ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्कामध्ये त्यांच्या कर्मचाऱ्यांना १० टक्के सवलतीबाबत प्रस्ताव पाठविल्यास सकारात्मक विचार करता येईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025

पुढारी

# विद्यापीठात ऑनलाईन एम.कॉम., एम.एस्सी अभ्यासक्रमांना मान्यता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ नॅक A++ मानांकन व विद्यापीठ अनुदान आयोगाने कॅटेगिरी-I दर्जा बहाल केल्याने एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांना ऑनलाईन पद्धतीने प्रवेश देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ महाराष्ट्रातील एकमेव ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम., एम.एस्सी (गणित) सुरू करणारे सार्वजनिक विद्यापीठ ठरले आहे. ऑनलाईन अभ्यासक्रमाच्या पदवी इतर कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या समकक्ष आहे. ऑनलाईन एम.कॉम. व एम.एस्सी (गणित), अभ्यासक्रम मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषद, विविध अधिकार मंडळे, कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025
पुण्यनगरी

# ऑनलाईन 'एमबीए'साठी शुल्क सवलत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने सुरू केलेल्या ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ अधिकार मंडळाने शुल्कामध्ये सवलत दिली आहे. याचा लाभ सरकारी संस्था, निमसरकारी व खासगी संस्था यामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रमासाठी विद्यापीठातील आजी-माजी कर्मचारी, त्यांचे पाल्य किंवा पदवीधर विद्यार्थी, महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक तसेच विद्यापीठ व महाविद्यालयांतील प्रशासकीय कर्मचारी व त्यांचे पाल्य यांना शिक्षण शुल्कामध्ये १० टक्के सवलत देण्यात येणार आहे. सरकारी संस्था, निमसरकारी व खासगी संस्था यांच्याकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांना १० टक्के सवलत देण्यासाठी प्रस्ताव पाठवल्यास सामंजस्य करार करण्याबाबत सकारात्मक विचार करता येईल, असेही त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2025

पुण्यनगरी

# ऑनलाईन एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), अभ्यासक्रमांना मान्यता

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठास नॅक अ++ मानांकन व विद्यापीठ अनुदान आयोगाने 'क' दर्जा बहाल केल्याने एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांना ऑनलाईन पद्धतीने प्रवेश देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली. शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव ऑनलाईन एमबीए, एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) सुरू करणारे सार्वजनिक विद्यापीठ ठरले आहे. ही शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासातील गौरवास्पद बाब आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नोकरी, व्यवसाय सांभाळत ऑनलाईन एमबीए, एम. कॉम., एम.एस्सी. (गणित), अभ्यासक्रमांची पदवी घेता येणार आहे. ऑनलाईन अभ्यासक्रमाच्या पदवी इतर कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या समकक्ष आहे, असेही त्यांनी नमूद केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

09 MAR 2025 तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने पदवी, पदव्युत्तर प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार अर्ज भरण्यास प्रारंभ झाला असून एक महिन्याची मुदत देण्यात आली आहे. विद्यापीठाच्यावतीने दरवर्षी विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश




परीक्षा घेतल्या जातात. ८ मार्च ते ८ एप्रिल याकालावधीत

■ परीक्षा अर्ज भरण्यास प्रारंभ

विद्यार्थ्यांना अर्ज करता येणार आहे. यामध्ये एम.एस्सी. केमेस्ट्री, इलेक्ट्रॉनिक्स, बॉटनी, झूलॉजी, फिजिक्स, मॅथेमॅटिक्स, मायक्रोबायलॉजी, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर सायन्स, अॅग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, एमबीए (रुरल मॅनेजमेंट) आदी विविध अभ्यासक्रमांचा समावेश आहे. १३ ते १७ मे दरम्यान परीक्षा होणार आहेत. तात्पुरती गुणवत्ता लवकरच जाहीर केली जाणार आहे. सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेतस्थळास विद्यार्थ्यांनी भेट द्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.


जनसंपर्क कक्ष
09 MAR 2025
पुण्यनगरी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिवस्पंदन'वर तंत्रज्ञान अधिविभागाचे वर्चस्व

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवामध्ये अखेरच्या पाचव्या दिवशी क्रिकेटसह बास्केटबॉलमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी विजेतपद मिळवले.

सकाळच्या सत्रात झालेल्या महिलांच्या क्रिकेटमधील अंतिम सामन्यात गणित अधिविभागावर मात करत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम क्रमांक मिळवला. गणित अधिविभागाने द्वितीय आणि नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाने तृतीय क्रमांक पटकावला. महिलांच्या बास्केटबॉल स्पर्धेतही तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम क्रमांक मिळवला.



गणित अधिविभागाने द्वितीय, तर क्रीडा अधिविभागाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. महिलांच्या रस्सीखेच स्पर्धेत नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, क्रीडा अधिविभागाने द्वितीय आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटने (वायसीएसआरडी) तृतीय क्रमांक पटकावला. पुरुषांच्या रस्सीखेच स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, वायसीएसआरडीने द्वितीय आणि क्रीडा अधिविभागाने तृतीय क्रमांक पटकावला. क्रीडा व शारीरिक संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

स्पर्धेचा अंतिम निकाल अनुक्रमे असा, ४ बाय १०० रिले : क्रीडा अधिविभाग, तंत्रज्ञान अधिविभाग आणि जीवशास्त्र अधिविभाग. लांब उडी (महिला) : देवयानी सबनीस (तंत्रज्ञान अधिविभाग), अंजली लोहार (अन्न विज्ञान आणि तंत्रज्ञान), नंदिनी कुंभार (गणित). ४०० मी. (महिला) : मनीषा पाटील (क्रीडा), अनुष्का भोसले (गणित), अनुष्का पाटील (क्रीडा), १०० मी. (पुरुष) : आर्यन शेजाळ (क्रीडा), क्रिश पोतदार (क्रीडा), नइलान्झी बोनगिनकोसी मायकल (वाणिज्य व व्यवस्थापन).